जगभर

अरब वसंत : आढावा

चंद्रशेखर पुरंदरे

उत्तर आफ्रिका व मध्यपूर्वेतील मुस्लिम देशात 'लोकशाही हवी' अशी आंदोलने सुरू झाली. डिसेंबर २०१० ला ट्युनिशिया, मग इजिप्त व मग लिबिया येथे तीस-चाळीस वर्षे सतत सत्तेवर असणारे हुकूमशहा उलथले गेले. येमेनमध्ये हुकूमशहाने सत्तांतर करण्याचे मान्य केले आहे. जॉर्डनमध्ये वरवरच्या घटनादुरुस्ती करून लोकांचा विरोध बोथट करण्याचा तिथल्या राजाचा प्रयत्न आहे तर सीरियात सत्ता सोडायला तयार नसलेली हुकूमशाही आपल्या नागरिकांवर लष्करी वरवंटा फिरवत आहे. सुमारे दोन वर्षांनंतर अरब जगताचा आढावा घेणे उचित ठरावे. त्यावेळी 'क्रांती' म्हणून जाहीर झालेल्या घटनांनी नक्की काय साधले आहे - ते फक्त तात्कालिक उठाव होते की दीर्घकालीन परिवर्तनाची सुरूवात होती हे पहावे लागेल.

प्रथम ट्युनिशिया. तेथे बेन अली हा हुकूमशहा तीसहून अधिक वर्षे सत्तेवर होता. सरकारी खजिन्यातून स्वत:चे कुटुंबीय व इष्ट मित्रमंडळी यांची बरकत करणे हा त्याचा उपक्रम अव्याहत चालू होता. बेन अली पदच्युत व परांगदा झाल्यावर ट्युनिशियात लोकशाही आली. त्याबरोबर आचार-विचार स्वातंत्र्य आले. पण अर्थव्यवस्था डळमळीतच आहे, बेरोजगारी वाढते आहे. निर्वाचित सरकारही स्थिर दिसत नाही. लोकशाहीचे एक गमक म्हणजे राज्य कसे चालवावे याबाबत इतर आदर्शवादही प्रस्तुत असू शकतात या दृष्टिकोनाला लोकमान्यता असणे. ती लोकमान्यता ट्युनिशियात थोड्याफार प्रमाणात तरी रूजलेली दिसते. या लोकमान्यतेला प्रमुख अडसर म्हणजे मूलतत्त्ववादी. ते घड्याळाचे काटे चौदाशे वर्षे मागे फिरवायला पाहतात. त्यांना इतर आदर्शवाद मंजूर तर नाहीच पण हिंसा हा त्यांच्या आदर्शवादाचा अविभाज्य भाग आहे. ट्युनिशियाला पिछाडीला नेणारा हा घटक ठरू शकतो. उदाहरणार्थ, नवीन सरकारपुढे नव्या देशाची घटना लिहिणे हा प्रधानक्रम आहे. लोकशाहीसाठी कायदा व न्यायव्यवस्था तर हवी. ही घटना 'शरियत' या मुस्लिम प्रथेनुसार असावी असा मूलतत्त्ववाद्यांचा आग्रह आहे. पण आजतरी निर्वाचित सरकार या आग्रहाला बळी पडलेले नाही. घटनेमध्ये 'शरिया' या शब्दाचा उल्लेखही न करण्यात सरकार यशस्वी झाले. जहाल गटाला सवलत म्हणून काही 'मुस्लिम' तरतुदींचा घटनेत समावेश करण्यात आला आहे. अशी एक तरतूद म्हणजे 'पवित्र' गोष्टींवर 'टीका' करणे हा दखलपात्र फौजदारी गुन्हा ठरेल. मात्र 'पवित्र' म्हणजे काय किंवा 'टीका' म्हणजे काय या व्याख्या केलेल्या नाहीत! मुस्लिम धर्माचा प्रभाव जास्त असावा की कमी ही चर्चा अर्थव्यवस्था मजबूत करण्याच्या प्राधान्यक्रमाला निराळाच फाटा फोडते. त्यामुळे सत्ताबदलानंतरही युरोपातील संपन्न देशांत - विशेषत: फ्रान्सला - स्थलांतरित होणाऱ्या तरुणांची संख्या वाढते आहे.

ट्युनिशियानंतर इजिप्त पाहू. इजिप्त हे लोकसंख्येने सर्वात मोठे अरब राष्ट्र आहे. तेथील सर्वेसर्वा होस्ने मुबारक ट्युनिशियाच्या बेन अलीसारखाच तीन दशकाहून जास्त काळ सत्तेवर राहिला. तो अमेरिकेच्या आर्थिक व लष्करी पाठिंब्यावर सत्ता दीर्घकाळ टिकवू शकला. ट्युनिशियाप्रमाणेच इजिप्तमधील सत्तापालट तरुण पिढीने घडवून आणला. पण मुबारक गेल्यावर त्याने नियुक्त केलेले लष्कर व नोकरशाही काही बरखास्त झाली नाही. त्यामुळे निर्वाचित सरकारच्या, अगदी अध्यक्षाच्या, निर्णयक्षमतेवर बंधने आहेत. 'आम्ही क्रांतीच्या अपेक्षेने सरकार बदलले पण व्यवस्थेने तो प्रयोग (आणि आम्हाला) फसवला' अशी भावना जनसामान्यांत आहे. मुळात निवडणुका झाल्या त्याच मवाळ इस्लामवादी पक्षात आणि लष्करी पक्षात. हे दोन्ही, वस्तुत:, बहुसंख्य जनतेला पर्याय म्हणून नकोच होते. ही परिस्थिती आपल्याकडच्यासारखीच उडदामाजी काळे-गोरे सारखी होती. त्यात परत मुस्लिम मूलतत्त्ववादी या सत्तापालटाचा फायदा घेण्यास उत्सुक आहेतच. त्यांच्या मते तर सत्तापालट त्यांनी घडवून आणला तोच मुळात इस्लामी राज्य यावे म्हणून. अलिकडच्या काही हिंसक घटनांवरून ते आपली उपद्रवशक्ती दर्शवत आहेत हे दिसत आहे. इजिप्तमध्ये ख्रिश्चन अल्पसंख्यांक आहेत. त्यांच्यावर हल्ल्यांचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे इजिप्त सोडून जाणाऱ्या ख्रिश्चनांचे प्रमाणही वाढले आहे. दरम्यान मोहम्मदावर टीका करणारा एक व्हिडिओ प्रसृत झाल्यावर परत एकूणच मध्यपूर्वेत अमेरिकाविरोधी व मूलतत्त्ववादाची लाट उसळली. (व्हिडिओ अमेरिकेत तयार झाला, त्यावर त्या सरकारनेही टीका केली पण मध्यपूर्वेत असे फरक लक्षात घेतले जात नाहीत.) तशी इजिप्तमध्येही निदर्शने, अमेरिकन वकिलातीवर हल्ले झाले. लिबियात तर अमेरिकन राजदूताला ठार मारण्यात आले. या हत्येचा लिबियन सरकारने तीव्र निषेध केला पण इजिप्त सरकारने तितक्या तीव्रपणे निषेध केला नाही. एकतर नवीन सरकार अमेरिकेपासून अंतर ठेवू इच्छिते. दुसरे म्हणजे जहाल गटाचा दबाव. त्यामुळे या घटनेनंतरच्या

वक्तव्यात ओबामांनी 'इजिप्त आमचा शत्रूही नाही आणि मित्रही नाही' असा उल्लेख केला. इजिप्तमध्येही अर्थव्यवस्था नाजूक आहे आणि बेरोजगारी वाढते आहे. पण लष्कर आणि मवाळ किंवा जहाल मूलतत्त्ववादी यांच्या सत्तास्पर्धेत लोकांच्या भाकरीच्या प्रश्नाकडे सरकार कितपत लक्ष देऊ शकेल हा प्रश्नच आहे.

लिबिया या तिसऱ्या देशातही सत्तांतर झाले. कर्नल गडाफीची पदच्युती NATO (अमेरिका व पश्चिम युरोप) यांच्या लष्करी पाठिंब्याखेरीज झालीच नसती. तेथेही निवडणुका झाल्या व निर्वाचित सरकार सत्तेवर आले. पण त्याबरोबर भिन्नवंशीय टोळ्यांमधील वैमनस्यही उफाळून आले. गडाफीच्या बंदुकीने हे वैमनस्य दाबून ठेवले होते. तेथेही मूलतत्त्ववादी पाय पसरत आहेत. सलाफी या कडव्या इस्लामचे अनुयायी मुस्लिमांतर्गत इतर पंथांना धर्मद्रोही मानतात. त्यांची प्रार्थनास्थळे, स्मारके उद्ध्वस्त करणे असे प्रकार वाढत आहेत. नवी राजवट अक्षम तरी आहे किंवा राजवटीतील काही उच्च पदाधिकारी जहाल मुस्लिमांना सहानुभूत तरी आहेत.

म्हणजे, या तीन देशांचा विचार करता, हुकूमशाह्या लोकांनी उलथल्या हा चमत्कारच म्हणावा लागेल. Means of Production ही मार्क्सची संकल्पना लक्षात घेता उत्पादनाची संसाधने अजून त्या देशांत आहे-रे वर्गाच्या हातातच आहेत. ती नाही-रे वर्गाकडे जोपर्यंत येत नाहीत तोपर्यंत या परिवर्तनाला 'क्रांती' म्हणता येणार नाही.

मध्यपूर्वेत इतरत्र पहाता सीरिया हा खरा प्रश्न दिसतो. आजवर तिथे ३०,००० निरपराध हकनाक मारले गेले आहेत. राजवटीच्या विरोधात सशस्त्र गनिमी युद्ध करणाऱ्यांच्यात एकी नाही, त्यांना सौदी अरेबिया आणि कटार हे देश पश्चिमेच्या संमतीने शस्त्रे पुरवतात पण ती पुरेशी नसतात. त्यात विरोधकांचे बळ आजवर बशर असाद या हुकूमशहाच्या सैन्यातून येणारे फुटीर सैनिक हे होते. पण राजवटीने आता दमनाची व्यूहरचना बदलली आहे. आजवर पायदळ, रणगाडे घालून विरोधकांच्या मोहल्ल्यावर हल्ले करण्यात येत असत. यायोगे सरकारी सैन्य व सीरियन प्रजा यांच्यात थोडीफार, छुपेपणाने का होईना, भावनिक व वैचारिक देवघेव होत असे. या देवघेवीतून सरकारी सैन्यातून बाहेर पडावे असा निर्णय घेऊन, शस्त्रास्त्रांसकट हे सैनिक विरोधी सैन्यात सामील होत असत. पण आता राजवटीने हवाईहल्ले सुरू केले आहेत. त्यामुळे बृहत्समाज व सैनिक यांचा प्रत्यक्ष संबंध हिंसेपुरताच येतो. त्यामुळे नवीन फुटीरांची संख्या एकदम कमी झाली आहे. ना सरकार जिंकत ना विरोधक, अशा अनिर्णित अवस्थेत गेले वर्षभर रोज दोनशेतरी नागरिक मात्र बळी जात आहेत. अशावेळी लिबियासारखाच पश्चिमेचा (किंवा तुर्कस्तानचा) हस्तक्षेप पारडे झुकवू शकतो.

सीरियाची राजवट शिया मुस्लिम व प्रजा शिया व सुन्नी मुस्लिम आहे. सौदी, कटार हे सुन्नी देश त्यामुळे राजवटीच्या विरोधात आहेत तर इराण हा शिया देश राजवटीच्या बाजूचा आहे. सीरियाचा उत्तरेचा शेजारी तुर्कस्तान आहे. सीरियन यादवीमुळे सुमारे एक लक्ष निर्वासित तुर्कस्तानमध्ये गेले आहेत. त्यामुळे त्या देशातही अंतर्गत अस्वस्थता आहे. ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यात सीरियन लष्कराने सीमेवरून एका तुर्क खेड्यावर गोळीबार केला. त्यात तीन महिला आणि दोन मुले ठार झाली. त्याआधीही सीरियन लष्करी कारवाया तुर्कस्तानला अस्वस्थ करत आलेल्या आहेत. त्यामुळे त्या दोन देशांत युद्धसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. खरोखर युद्ध झालेच तर संपूर्ण मध्यपूर्वेला त्याचे चटके बसतील. सीरियाचा दक्षिणेचा शेजारी लेबॅनन. तेथे शिया, सुन्नी मुस्लिम व ख्रिश्चन असे साधारण समान संख्येचे गट आहेत. तेथेही सीरियन यादवीचे प्रतिसाद उमटत आहेत.

एकूण चित्र पाहता, जेथे सत्तांतरे झाली, तेथे श्रेयस्कर दिशेने, अडखळत का होईना, वाटचाल चालू दिसते. बहारिनसारख्या देशात विरोध लष्करामार्फत दडपूनच टाकला गेला, सौदीत तर विरोध उभा राहणेच कठीण आहे, तर सीरियन रक्तस्राव किती काळ चालेल हे सांगणे कठीण आहे.

E-mail - artnondeco@yahoo.co.uk
Website - www.art-non-deco.com